| | |
|---|---|
| MHKO030109752023 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.१९०/२०२३.**<br>**आफरोज वाजीदअलीशाह मोदी व इतर**<br>*विरुध्द*<br>**वाजीदअलीशाह बालेचॉद मोदी व इतर** |

## निशाणी क्रमांक ०५ वरील पारीत आदेश

सदर कामी दोन्ही पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. त्या अनुषंगे खालील मुद्दे विचाराधीन आहेत. त्याचे उत्तर कारणमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार ही तिचे वि.प. यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार ही त्यांच्यावर वि.प.याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| ०३. | अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.२०,०००/- इतकी अंतरिम पोटगी वि.प.यांच्याकडून मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०४. | आदेश काय ? | **आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

०२. सदर कामी वि.प. यांनी अर्जदार क्र.०१ व ०२ यांच्यासोबत असलेले पतीचे व पितृत्वाचे संबंध मान्य केले आहेत. त्यामुळे सदर कामी अर्जदार क्र.०१ व

०२ हे वि.प.क्र. यांच्याकडून पोटगी मागण्यास पात्र आहेत.

**०३.** अर्जदार कथन करतात की, अर्जदार यांचे डिप्लोमा इंटेरिअर डिझाईनरचे शिक्षण झाले आहे. वि.प.क्र.०१ यांचे एस.वाय.बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण झाले असून ते सध्या ईकॉम एक्सप्रेस कुरीअर सर्व्हीस, मज्जीद जवळ, न्यु शाहुपुरी, कोल्हापूर येथे नोकरी असून त्यांना दरमहा चांगले उत्पन्न मिळते. अर्जदार क्र.०१ व वि.प.क्र.०१ यांचा विवाह अब्दुल रशिद सनदी यांच्या मध्यस्थीने ठरला होता. त्यावेळी वि.प.क्र.०१ हे ॲमेझॉन कपंनीमध्ये काम करत असून त्यांना दरमहा रक्कम रु.५०,०००/– इतके उत्पन्न असल्याचे सांगितले होते. अर्जदार क्र.०१ व वि.प.क्र.०१ यांचा विवाह दि.११/१०/२०२० रोजी शिंदे लॉन, टिंबर मार्केट, कोल्हापूर येथे मुस्लीम धर्मशास्त्राप्रमाणे झाला आहे. लग्नानंतर अर्जदार क्र.०१ वि.प. यांच्या घरी नांदण्यास गेल्यानंतर वि.प. यांनी अर्जदाराचा मानसिक छळ करण्यास सुरुवात केली. सर्व वि.प. हे अर्जदारास घालुन पाडून बोलत होते. तसेच वि.प.क्र.०१ यांनी अर्जदाराकडे कार व २० तोळे सोन्याची मागणी केली. वि.प.क्र.०३ म्हणजेच अर्जदाराची नणंद व तिचे पती अर्जदार यांच्या संसारामध्ये जास्त हस्तक्षेप करत होते. तसेच वि.प.क्र.०१ यांनी अर्जदार क्र.०१ यांना ''तु व तुझ्या घरच्यांनी माझी बदनामी केली आहे'' असे म्हणून त्यांना नांदवण्यास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर मध्यस्थामार्फत त्यांची समजुत काढून अर्जदार यांनी ''माहेरी जायचे नाही, आई वडीलांशी बोलायचे नाही इ.'' जाचक अटी लावून त्यांनी नांदवण्यास तयार दाखवली. त्यानंतर वि.प.यांनी अर्जदाराविरुध्द एस.पी.ऑफीस येथे खोटी तक्रार दिली. अर्जदाराच्या गरोदरपणात देखील वि.प. यांनी काहीही चौकशी केली नाही. अर्जदाराच्या डिलीव्हरीचा खर्च अर्जदाराच्या घरच्यांनी केला आहे. अर्जदाराने मध्यस्थामार्फत वि.प.यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पण तरी देखील तो सफल झालेला नाही.

**०४.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वि.प.क्र.०१ यांनी अर्जदार क्र.०१ यांच्याशी एकतर्फा घटस्फोट घेण्याकरीता ''तलाक–ए–हसन'' प्रमाणे ३ तलाक नोटीस देऊन नि.दि.दा. क्र.१७०/२०२३ मा.दिवाणी न्यायाधिशसो व.स्तर, कोल्हापूर येथे दाखल केल्याचे कळाले. वि.प. यांनी अर्जदाराची फसवणूक केली आहे. वि.प.यांनी अर्जदार क्र.०१ व ०२ यांच्या पोटापाण्याची, औषधोपचाराची कोणतीही तरतुद केलेली नाही. म्हणुन अर्जदार यांना उदर निर्वाहाकरीता दरमहा र.रु.२०,०००/–, नुकसान भरपाई म्हणून र.रु.५,००,०००/– व वैद्यकीय खर्च म्हणून र.रु.१,००,०००/–ची मागणी केलेली आहे. तसेच सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.५०,०००/– वि.प.कडून मिळावेत अशी मागणी केली आहे.

**०५.** वि.प. यांनी या कामी हजर होऊन म्हणणे वेळेत न दिल्याने त्यांच्याविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत झाला होता. नि.क्र.१२ कडे अर्ज देऊन वि.प. यांनी म्हणणे नाही चा आदेश रद्द करुन मिळण्याबाबत विनंती केली आहे. सदरचा अर्ज रक्कम रु.५००/– कॉस्टवर अर्जदार यांना देण्याच्या अटीवर मंजूर केला होता परंतु आठ महिने उलटून गेल्यानंतरही वि.प. यांनी सदरची कॉस्ट न भरल्याने त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेतलेले नाही. अर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सकृतदर्शनी वि.प. यांनी त्यांच्यावर हिंसाचार केला असे दिसुन येते. पत्नी या नात्याने अर्जदार या वि.प.क्र.०१ यांच्याकडे पोटगी मागण्यास पात्र आहेत. म्हणुन मुद्दा क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**०६.** अर्जदार हिने नि.क्र.०१ कडील अर्जामध्ये वि.प.हे अमेझॉन या कंपनीमध्ये रक्कम रु.५०,०००/– इतके कमवत असल्याबाबत कथन केले आहे परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार यांनी नि.क्र.१५ कडे विविध ५६ कागद दाखल केले आहेत. त्यामध्ये मुलाच्या औषधाची तसेच हॉस्पीटलची, लॅबोरेटरीची बिले

दाखल केलेली आहेत. वि.प. यांचा उत्पन्नाच्या स्त्रोत दाखविण्याकरीता म्हणून सोशल मिडीया –वरील फिरायला गेल्याचे फोटो दाखल केलेले आहेत. सदर फोटोंचे अवलोकन केले असता, नेमके वि.प. यांचे उत्पन्न किती हे समजू शकत नाही. परंतु अर्जदार क्र.०१ या वि.प. यांची पत्नी असून अर्जदार क्र.०२ मुलगा आहे व त्यांचा सांभाळ करणे वि.प.क्र.०१ यांची नैतिक जबाबदारी आहे. वि.प.यांचे राहणीमान पाहता अर्जदार क्र.०२ यांची शारिरीक स्थिती पाहता अर्जदार क्र.०१ करीता दरमहा रक्कम रु.४,०००/– व अर्जदार क्र.०२ करीता दरमहा र.रु.५,०००/– इतकी अंतरिम पोटगी म्हणुन देण्याबाबत आदेशित करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मुद्दा क्र.०३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.०४ करिता खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

**०१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वि.प.क्र.०१ यांनी अर्जदार क्र.०१ यांना दरमहा रक्कम रु.४,०००/– (चार हजार रुपये फक्त) व अर्जदार क्र.०२ यांना दरमहा रक्कम रु.५,०००/– (पाच हजार रुपये फक्त) अशी एकूण रक्कम रु.९,०००/–(नऊ हजार रुपये फक्त) इतकी अंतरिम पोटगी म्हणुन अर्ज दाखल झालेल्या तारखेपासून द्यावे.

**०३.** वि.प.क्र.०१ ते ०३ व तर्फे इसमांनी म.कौं.हि.सं.कायदा कलम १९(३) प्रमाणे तो भविष्यात अर्जदार हिला कोणत्याही प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास होईल अशी कोणतीही कृती करणार नाही असे लेखी बंधपत्र या आदेशापासून एक महिन्याच्या आत दाखल करण्यात यावे.

**०४.** अर्जदार हिला निर्देशीत करण्यात येते की, तिने मुळ अर्जावर विनाविलंब तिचा साक्षीपुरावा सादर करावा तसे न केल्यास अंतरिम आदेशाबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

**०५.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2025.10.08 15:09:47 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दि.०६/१०/२०२५. न्यायालय क्र.१४, कोल्हापुर.